जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी तरुणांवर

## माधवराव माने; 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' ध्वनिमालिकेचा समारोप

▸सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कित्येक स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले. ते स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी तरुण, भावी पिढ्यांच्या खांद्यावर आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माधवराव भुजंगराव माने यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्षातर्फे आयोजित 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत 'शिव-वाणी' यू-ट्यूब ध्वनी वाहिनीवरून १५ ऑगस्ट २०२२ पासून रोज सकाळी ९ वाजता वर्षभर 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' ध्वनिमालिका प्रसारित केली. या मालिकेचा समारोप मंगळवारी येळावी (ता. तासगाव, जि. सांगली) येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माने यांच्या उपस्थितीत झाला. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.




कोल्हापूर : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माधवराव माने यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाला. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. प्रमोद पाटील, अवनीश पाटील, विलास शिंदे, अरुण भोसले, प्रकाश गायकवाड.

माने म्हणाले, 'महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मार्गदर्शनाखाली १९४२च्या आंदोलनात सहभागी झालो. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील प्रतिसरकारही यशस्वी करून दाखविले.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींना उजाळा देण्याचा उपक्रम वर्षभर चालवून जणू रोज अमृतमहोत्सव केला.'

ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरुण भोसले, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

स्वातंत्र्यसैनिक माने यांनाच समर्पित 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' मालिकेतील अखेरच्या ३६६व्या भागाचे त्यांच्याच उपस्थितीत प्रसारण झाले. मालिकेच्या यशस्वितेत योगदान देणारे डॉ. अरुण भोसले, डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. भारतभूषण माळी, अजितकुमार जाधव, धीरज शिंदे, सुरेश शिखरे, सुस्मिता खुटाळे, मल्हार जोशी, विनायक ठोंबरे यांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र, ग्रंथभेट देऊन गौरव झाला. डॉ. प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले, शरद बनसोडे उपस्थित होते. डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### आठवणींनी रोमांच

▪ स्वातंत्र्यसैनिक माने यांनी तल्लख स्मरणशक्तीच्या जोरावर वयाच्या ९९व्या वर्षीही स्वातंत्र्यलढा व प्रतिसरकार आंदोलनाच्या आठवणी सांगून तरुणांना रोमांचित करून सोडले.

### प्रश्नमंजूषेमधील विजेते

ध्वनिमालिकेवर आधारित जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धा झाली. विजेत्यांमध्ये वैष्णवी जाधव, धनश्री पाटोळे, कल्याणी जाधव, संजीवनी खिलारी, स्वप्नाली पवार, धैर्यशील जाधव, विश्वास घोडे, तुकाराम पाटील, किरण मुसळे यांचा समावेश आहे.

सकाळ



कोल्हापूर : रत्नाप्पा कुंभार नगरमधील सरोज चौगुले यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनास एक लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. या वेळी विजय ककडे, प्रमोद पाटील, विलास शिंदे, आर. बी. पाटील आदी उपस्थित होते.

# भगवान महावीर अध्यासनाला दुर्मिळ ग्रंथ, एक लाखाची देणगी

कोल्हापूर : येथील रत्नाप्पा कुंभार नगरमधील सरोज चौगुले यांनी शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनास आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ दुर्मिळ ग्रंथ आणि एक लाख रुपयांची देणगी दिली. चौगुले यांनी प्राचीन १६ ग्रंथ आणि नित्य वाचनासाठी त्यांचे धाकटे बंधू प्राचार्य डॉ. सुभाषचंद्र मादनाईक आणि ज्येष्ठ बंधूसमान तात्यासाहेब पाटील यांच्या स्मरणार्थ १२० पुस्तके दिली. अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी त्यांनी एक लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. चौगुले यांचा सत्कार कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल आणि विद्यापीठ बोधचिन्ह, ग्रंथ देवून करण्यात आला. अध्यासनाच्या पदविका व प्रमाणपत्र परिक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव विलास शिंदे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, प्रा. आर. बी. पाटील, बी. डी. खणे, आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. विजय ककडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 AUG 2023
सकाळ

# विद्यार्थ्यांत सर्व विषयांप्रती जिज्ञासा आवश्यक

## डॉ. नानासाहेब थोरात : 'मीट दि सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : 'विद्यार्थ्यांमध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यास व संशोधनाचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी त्यांच्या मनात सर्व विषयांप्रती जिज्ञासा आणि आदरभाव निर्माण होणे आवश्यक आहे', असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मेरी क्युरी फेलो डॉ. नानासाहेब थोरात यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षाच्या वतीने 'मीट दि सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत डॉ. थोरात यांचे 'आंतरविद्याशाखीय संशोधनातील जागतिक संधी व उपयोजन' या विषयावरील व्याख्यान झाले. राजर्षी शाहू सभागृहातील या




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक डॉ. नानासाहेब थोरात यांचे व्याख्यान झाले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी आज ज्ञानसंपादनाच्या प्रक्रियेकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहायला हवे. विज्ञान विषयांइतकेच तत्त्वज्ञान आणि सामाजिक शास्त्रांतील ज्ञान व संशोधनही महत्त्वाचे आहे. एका विषयामध्ये तज्ज्ञ होणे गरजेचे आहेच; पण, अन्य विषयही समजावून घेण्यास प्राधान्य द्यावे.'

### सातत्याने प्रश्न विचारायला हवेत : कुलगुरू डॉ. शिर्के

■ कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी आपली जिज्ञासा टिकविण्यासाठी आणि शमविण्यासाठी सातत्याने प्रश्न विचारायला हवेत. महत्त्वाचे म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यासाठी प्रेरित करायला हवे. सर्वोत्कृष्टतेचा ध्यास बाळगून विविध विद्याशाखांमध्ये संयुक्त संशोधन सहकार्य वृद्धिंगत होणे आवश्यक आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी आपल्या परिस्थितीचा बाऊ करण्यापेक्षा धाडसी निर्णय घ्यायला शिकले पाहिजे. अपयशाची भिती न बाळगता जागतिक संधी मिळविण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे यायला हवे.' या कार्यक्रमास डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय कक्षाचे संचालक डॉ. एस.बी. सादळे यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठाच्या वित्त, लेखाधिकारीपदी डॉ. सुहासिनी पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी पदावर डॉ. सुहासिनी पाटील रुजू झाल्या. राज्य शासनाच्या वित्त व लेखा सेवा विभागाच्या उपसंचालक संवर्गातून डॉ. पाटील यांची शासन आदेशाद्वारे नियुक्ती झाली आहे. डॉ. पाटील यांनी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्याकडून कार्यभार स्वीकारला.

यापूर्वी डॉ. पाटील सांगली येथे कोषागार अधिकारी होत्या. त्यांनी कोल्हापूर, सांगली येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये काम पाहिले आहे.

लोकमत

# आंबेडकर केंद्रास महाथेरोंची भेट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रास भन्ते डॉ. यशकाश्यपायन महाथेरो यांनी नुकतीच भेट दिली. महाथेरो यांनी पाली भाषेतील संशोधित प्रबंध व त्या भाषेचे महत्त्व सांगितले. यावेळी केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, ॲड. शिवाजीराव घाटगे उपस्थित होते.

पुढारी

# पदवी, पदव्युत्तरच्या ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने गुरुवारअखेर पदवी, पदव्युत्तरच्या ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. गुरुवारी बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्किटेक्चर आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. परीक्षेला १,६३३ विद्यार्थी बसले होते. गुरुवारी एमबीए (सीबीसीएस) अभ्यासक्रमाचा निकाल घोषित झाला. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यामधून तीन गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# राज्याच्या सांस्कृतिक धोरणाबाबत सोमवारी बैठक

कोल्हापूर ः महाराष्ट्र शासनाने २०१० या वर्षात सांस्कृतिक धोरण निश्चित केले आहे. काळानुसार बदलणारे सांस्कृतिक बाबींचे स्वरूप आणि या क्षेत्रातील तज्ज्ञ सर्व सामान्य नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेऊन धोरणाचा फेर आढावा घेण्याचे काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठात सोमवारी (ता. २१) बैठकीचे आयोजन केले आहे. चित्रपट धोरण कसे असावे, याबाबत या क्षेत्रातील मान्यवरांची मते जाणून घेण्यासाठी धोरण समितीने या बैठकीचे आयोजन केले आहे. अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहात सकाळी नऊ ते पाच या वेळेत ही बैठक होईल. कोल्हापूर, सांगली, मिरज, इचलकरंजी या भागातील या क्षेत्राशी संबंधितांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीने केले.

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ६३२ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरूवारी बॅचलर ऑफ लॉ (फाईव्ह इयर), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्किटेक्चर या विषयांच्या परीक्षा ऑफलाईन वर्णनात्मक पध्दतीने झाल्या. या परीक्षेला १६३३ विद्यार्थी उपस्थित होते. तर आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ६३२ विषयांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.